ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-5 No. 2 January–December 2020

# कोविड -१९ चे भारतीय राज्यव्यस्थेवरील दुष्परिणाम

**प्रा. मारुती चांगदेव हजारे**

संतोष भीमराव पाटील आर्टस्, कॉमर्स, सायन्स

कॉलेज मंद्रूप मो.नं.८८९६८१९०६३

**प्रस्तावना**

कोविड -१९ हा विषाणू ३१ डिसेंबर २०१९ मध्ये चीन या देशाच्या वुहान शहरामध्ये आढळून आला. कोरोना विषाणू ही विषाणूची एक मोठी family आहे. या विषाणूचा संसर्ग झाल्यामुळे माणूस आजारी पडतो. कोरोना विषाणूमुळे साध्या सर्दीपासून ते मर्स MERS-Cov (Middle East Respiratory Syndrome) आणि सार्स SARS-Cov (Severe Acute Respiratory Syndrome) असे आजार होतात. नॉवेल कोरोना विषाणू हा कोरोना विषाणूमधील नवीन strain आहे, की ज्याची संपूर्ण माहिती अजून मानवी संशोधकांना झालेली नाही. जागतिक आरोग्य संघटना जागतिक किर्तीचे तज्ञ संशोधक, विविध देशातील सरकारे आणि इतर आरोग्य संघटना यांच्या मदतीने कोरोना विषाणूवर सुरक्षितता आणि प्रतिबंध या दृष्टीकोनातून संशोधन व उपाय-योजना करीत आहे. एखाद्या व्यक्तीला संसर्ग झाला व त्या व्यक्तीची निसर्गता प्रतिकारशक्ती (इम्युनिटी) निट काम करीत नसेल तेव्हा त्या व्यक्तीमध्ये विषाणूची वाढ होत जाते आणि त्यासोबतच रोगाची लक्षणे दिसायला लागतात व अशा व्यक्ती दगावण्याची देखील शक्यता असते.

कोविड-१९ या विषाणूच्या संसर्गातून निर्माण झालेल्या जागतिक महामारीमुळे बहुतांश देशांच्या राजकीय व्यवस्थेवर दीर्घकालीन दुष्परिणाम झालेला आहे. ही महामारी जगभर पसरून मोठ्या प्रमाणात जिवितहानी झालेली आहे. आजघडीला जगामध्ये रुग्णांची संख्या ४५,२५,१०३ झालेली असून ३,००,०५१इतके रुग्ण मृत्युमुखी पडलेले आहेत. तर १७,०३,७४२ इतके रुग्ण बरे झालेले आहेत. भारतात सरकारी आकडेवारीनुसार रुग्णांची संख्या ७८,००३ इतकी आहे. तर २४४९ मृत्यु झालेले असून २६२३५ इतके रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. भारताबरोबरच जगातील विविध देशातील रुग्ण संसर्गाची संख्या, मृत्यूंची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. कोविड-१९ च्या संक्रमणाचे स्वरूप एखाद्या झंजावातासारखे असल्यामुळे रोग प्रतिबंध, रोगनिवारण आणि रोग व्यवस्थापन या बाबतीत सर्वच देशांची सरकारे दुर्बल ठरत आहेत. या रोगावर कोणतीच लस अथवा औषध उपलब्ध नाही.

कोविड-१९ या विषाणूच्या संसर्गामुळे निर्माण झालेल्या महामारीविरोधात लढण्यासाठी भारत सरकारने सर्वात सोपा उपाय म्हणून संपूर्ण देशामध्ये लॉकडाऊनचा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय भारत सरकारने **१८९७ च्या एपिडेमिक डीसीजेस कायद्याप्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण कायदा २००५** प्रमाणे घेतलेला आहे. लोकांना विषाणूसंसर्ग होऊ नये म्हणून social distancing चे नियम केलेले आहेत. त्याचबरोबर विषाणूसंसर्ग झालेल्या व्यक्तीला ट्रेस करणे, त्यावर वेळेत औषधोपचार करणे, इतरांना त्यापासून संसर्ग होऊ नये म्हणून quarantine करणे व isolation ward मध्ये ठेवणे इत्यादी उपाय-योजना सरकार


Copyright © 2020 Authors

करीत आहे. यामुळे सरकारी यंत्रणेवर प्रचंड ताण आलेला आहे. लॉकडाऊनचे सुरुवातीचे तीन टप्पे ५० दिवस चालले आहेत. भारतातील लॉकडाऊन सर्वाधिक कठोर असूनही कोविड-१९ चा संसर्ग कमी न होता वाढतच आहे. हॉटस्पोट व कंटेन्मेट झोनमध्ये संसर्गाचा दर, मृत्युदर, दुपटीचा दर यात घट झाली असली तरी अजूनपर्यंत लॉकडाऊनचा पर्याय भविष्याबद्दल ठामपणे आशावाद देऊ शकत नाही.

**संशोधन निबंधाची उद्दिष्ट्ये:**

या संशोधन निबंधाचे लेखन खालीलप्रमाणे उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेऊन केलेले आहे.

1) कोविड-१९ या विषाणूच्या संसर्गाचे स्वरूप जाणून घेणे.
2) कोविड-१९ या विषाणूच्या संसर्गातून भारतात निर्माण झालेल्या महामारीमुळे भारतीय राजकीय व्यवस्थेसमोरील निर्माण झालेली आव्हाने समजून घेणे.
3) कोविड-१९ संसर्गातून भारतात निर्माण झालेल्या महामारीविरोधात लढण्यासाठी उपाययोजनांचा आढावा घेणे.

**कोविड -१९ चे भारतीय राज्यव्यवस्थेवरील दुष्परिणाम:**

कोविड-१९ चा भारतातील समाजव्यवस्थेवर दुष्परिणाम झाला आणि अर्थव्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले त्यामुळे त्याचा दुष्परिणाम भारतातील राजकीय व्यवस्थेवरदेखील झालेला आहे. भारतातील शासनसंस्थेची विविध अंगे असणाऱ्या कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळाच्या कामकाजावर व निर्णयप्रक्रियेवर याचा दुष्परिणाम झालेला आहे. तसेच भारतातील आरोग्ययंत्रणा, पोलीसयंत्रणा, अर्थव्यवस्था, शेती, बँकिंग, कायदा व सुव्यवस्था या सर्व क्षेत्रावर दीर्घकालीन दुष्परिणाम झालेला आहे. कोरोना पसरण्याच्या भीतीमुळे देशातील काही निवडणुका पुढे ढकलल्या जात आहेत.

**1) राज्यसरकारांची कार्यक्षमता:**

सर्वच सरकारे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचून विषाणूसंसर्ग झालेल्या व्यक्तीला ट्रेस करणे, त्यावर वेळेत औषधोपचार करणे, इतरांना त्यापासून संसर्ग होऊ नये म्हणून quarantine करणे व isolation ward मध्ये ठेवणे इत्यादी उपाययोजना करीत आहेत. याची सर्वस्वी जबाबदारी राज्य सरकारवर असल्यामुळे राज्य सरकारच्या यंत्रणेवर खूप मोठा ताण येत आहे. जेथे रुग्णांची संख्या जास्त आहे अशा संवेदनशील भागामधील नागरिकांचा सरकारी यंत्रणेवरील विश्वास कमी होत चाललेला दिसून येतो आहे. केंद्र सरकारने जरी लॉकडाऊन, social distancing या प्रकारचे नियम केले असले तरी ते लोकांवर लादणे कठीण होत चालले आहे. कारण भारतामध्ये मोठ्या प्रमाणात असणारी गरिबी, बेरोजगारी या कारणामुळे खूप मोठ्या प्रमाणात स्थलांतर झालेले आहे. आता लॉकडाऊनच्या काळात हेच कामगार, मजूर मोठ्या शहरांकडून आपल्या मुळगावी जात आहेत. त्यांच्यापुढे जगण्याचा, सुरक्षिततेचा व भाकरीचा खूप मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे सरकारी यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरदेखील ताण येत आहे.

 Copyright © 2020 Authors

**2) राजकीय नेतृत्वाची लोकप्रियता:**

कोविड-१९ च्या संसर्गातून भारतामध्ये निर्माण झालेल्या महामारीमुळे प्रत्येक भारतीय नागरिक मग त्याची जात, वर्ग, धर्म, प्रदेश, लिंग, वय कोणतेही असले तरी त्याच्या जीवनावर कमी-अधिक दुष्परिणाम झालेला दिसतोच. त्यामुळे राजकीय नेतृत्वाने लोकप्रियतेसाठी अतार्किक आणि अवैज्ञानिक युक्तिवाद करू नयेत. लोकशाहीमधील नेतृत्व अनुकूल, शांत आणि संयम बाळगणारे असले पाहिजे. सरकारी यंत्रणा उत्तमपणे काम करीत असताना, काम आणखी बिघडू नये याची काळजी नेतृत्वाने घ्यावी. असे असले तरी महामारीमुळे सर्वच राजकीय नेतृत्वाची लोकप्रियता कमी झालेली आहे.

**3) आरोग्ययंत्रणेवरील दुष्परिणाम:**

भारत हा एक विकसनशील देश आहे. लाखो नागरिकांना दर्जेदार पायाभूत आरोग्यविषयक सोयीसुविधा आणि मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी भारतातील राजकीय व्यवस्था अपुरी पडत आहे. कोविड-१९विरुद्ध लढा देण्यासाठी डॉक्टर, परिचारिका, प्यारामेडीक्स स्टाफ, स्वच्छता कर्मचारी निस्वार्थ भावनेने काम करीत आहेत. या कर्मचाऱ्यावर कामाचा अतिशय ताण येताना दिसून येतो. यासाठी त्यांना सर्व वैद्यकीय उपकरणे आणि संसाधने शासनाकडून वेळेत पुरविणे गरजेचे आहे. त्यांच्यासाठी आरोग्यविमा सुद्धा सरकारने काढणे गरजेचे आहे. बेडची क्षमता नसणे, व्हेंटिलेटरची अपुरी संख्या, सुरक्षा किटची अपुरी संख्या, चाचणी किटची अपुरी संख्या आणि आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या यामुळे आरोग्य यंत्रणा व शासन यामध्ये बऱ्याचवेळा संघर्ष निर्माण होताना दिसून येतो.

भारताच्या वार्षिक अंदाजपत्रकात आरोग्य क्षेत्रावर नेहमीच खूप कमी पैसे खर्च केले जातात. देशामध्ये अत्याधुनिक सोयी-सुविधा असणाऱ्या खाजगी व सरकारी हॉस्पिटलची संख्या एकूण लोकसंख्येचा विचार करता खूप कमी आहे. या महामारीने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की, भारताच्या सार्वजनिक आरोग्य यंत्रणेवर, संशोधनावर आणि सोयी-सुविधांवर भारताला आणखी जास्त गुंतवणूक करावी लागणार आहे.

**4) पोलीसयंत्रणेवरील दुष्परिणाम:**

कोविड-१९ विरुद्ध गंभीरपणे लढा देण्यासाठी व समुदायाचे संक्रमण रोखण्यासाठी केंद्र सरकारने लॉकडाऊनचा पर्याय निवडलेला आहे. लॉकडाऊनच्या सर्व नियमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पोलीस यंत्रणेवर टाकलेली आहे. नागरी पद्धतीने समाज कार्यरत राहण्याची हमी देत पोलीस नवीन आरोग्य व सामाजिक नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी समर्पित भावनेने अधिक महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाले तर पोलीस स्वतःची काळजी न घेता जनतेच्या जीवाचे रक्षण करीत आहेत. विरांसारखे लढत आहेत. जनतेचे देखील या यंत्रणेला सहकार्य अपेक्षित आहे.

**5) अर्थव्यवस्थेवरील दुष्परिणाम:**

 Copyright © 2020 Authors

केंद्र सरकार काही आर्थिक उपाययोजना करीत असले तरी भारतीय अर्थव्यवस्थेची प्रचंड हानी झालेली आहे. कोविड-१९ या विषाणूच्या संसर्गामुळे निर्माण झालेल्या महामारीविरोधात लढण्यासाठी भारत सरकारने लॉकडाऊन चा निर्णय घेतलेला आहे. त्यातून मुलभूत उद्योग-धंदे, व्यापार, वाहतूक बंद असल्यामुळे आर्थिक मंदीसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोविड-१९ या विषाणूमुळे बाजारपेठेच्या **"मागणी व पुरवठा"** या तत्वास जबरदस्त धक्का पोहचलेला आहे. केंद्र सरकारने १५ लाख कोटीचे उत्पादन गमावले आहे. १४ कोटी लोकांचा रोजगार गेला आहे. बेरोजगारीचे प्रमाण २७ टक्केपर्यंत वाढलेले आहे. राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा वेग घटत आहे. लाखो कामगार-मजूर स्थलांतर करीत आहेत. त्यांचे प्रचंड हाल होत आहेत. स्थलांतरित रोग संक्रमण व हालअपेष्ठा यामुळे मरत आहेत. कर्मचाऱ्यांचे पगार थांबलेले आहेत. बँकांची थकबाकी वाढणार आहे. पुढील काळात जर विषाणू संसर्ग व मृत्यूचे प्रमाण अधिक वाढत राहिले तर भारतीय अर्थव्यवस्थेची अत्यंत वाईट अवस्था होणार आहे. अर्थव्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र सरकारने भारताच्या एकूण जीडीपीच्या १०% म्हणजे वीस लाख कोटी रुपये एवढ्या आर्थिक मदतीची घोषणा केलेली आहे. या योजनेला त्यांनी **"आत्म निर्भर भारत"** असे नाव दिलेले आहे. ही आर्थिक मदत कारखान्यातील कामगार, शेतकरी आणि स्थलांतरित मजूर यांच्यासाठी असणार आहे. या महामारीला आळा घालण्यासाठी जगातील जवळपास ८४ देशांनी आर्थिक आणीबाणी घोषित केलेली आहे. त्याचबरोबर ३८ देशांनी इतर देशातील पत्रकारांना आपल्या देशात येण्यास बंदी घातलेली आहे.

**6) बँकिंग क्षेत्रावरील दुष्परिणाम:**

लॉकडाऊनचा परिणाम म्हणून देशातील बँकांना कामकाजाचे वेळापत्रक, व्यवहाराचे स्वरूप, कर्जांच्या हप्त्यांची वसुली व व्याजदर यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात बदल करावे लागले आहेत. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून ग्राहक व बँक कर्मचारी यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्यातील परस्परक्रिया यामध्ये देखील बदल करावे लागले आहेत. कर्मचाऱ्यांची संख्यादेखील कमी झालेली आहे. त्यामुळे बँका लोकांना शाखेत जाण्याऐवजी घरूनच डिजिटल पेमेंट प्रणाली वापरण्यास सांगत आहेत. त्यासाठी बँकांनी डिजिटल व्यवहार व एटीएम व्यवहारासाठी लागणारे शुल्क माफ केलेले आहे. या सर्वामुळे बँकांचा व्यवहार व नफादेखील घटणार आहे.

**7) कृषी क्षेत्रावरील दुष्परिणाम:**

ज्याप्रमाणे सर्वच क्षेत्रावर कोविड-१९ चा दुष्परिणाम झालेला आहे त्याप्रमाणेच कृषी क्षेत्रावर देखील झालेला आहे. संकटकाळात व नंतरच्या काळातदेखील शाश्वत अन्नाव्यवस्था सुनिश्चित करण्याच्या दृष्टीकोनातून कृषी क्षेत्रावरील दुष्परिणामांचा विचार करावा लागेल. लॉकडाऊन काळात नाशवंत फळे आणि भाज्या दुग्धजन्य पदार्थ, पोल्ट्री उत्पादने याची वाहतुक व पुरवठा साखळी खंडित झाल्यामुळे शेतमालाला योग्य भाव मिळताना दिसून येत नाही. तसेच इतर पीकांची काढणी, मळणी, साठवण, विपणन तसेच


Copyright ⓒ 2020 Authors

कृषीमाल प्रक्रिया उद्योग वेळेत न झाल्यामुळे कृषी क्षेत्राचे खूप मोठे नुकसान होऊ शकते. पुढील काळात शेतमालाची टंचाई निर्माण झाल्यास व मागणी मोठ्या प्रमाणात वाढल्यास याचा अत्यंत वाईट परिणाम कृषी क्षेत्रावर व जन जीवनावर होऊ शकतो.

**8) समाज जीवनावरील दुष्परिणाम:**

कोविड-१९ चा संसर्ग कमी करण्यासाठी केंद्र सरकारने ५० दिवसापासून हवाई, मेट्रो, रेल्वे, आणि बसचा प्रवास थांबविलेला आहे. हॉटेल, चित्रपटगृहे, मॉल्स, जिम, क्रीडा संकुले, शाळा, महाविद्यालये, याशिवाय राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमावर निर्बंध घातलेले आहेत. त्यामुळे सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक संरचना संकुचित झालेल्या आहेत. असे असले तरी प्रत्येकाने सामाजिकदृष्ट्या अधिक जबाबदार राहून आपल्या कर्तव्याचे पालन केले पाहिजे. निरोगी शरीर आणि मजबूत मनाने आपण कोरोनाला हरवू शकतो असा आत्मविश्वास प्रत्येक नागरिकांमध्ये असला पाहिजे.

**9) कायदा आणि सुव्यवस्था राखण्यातील अडथळे:**

केंद्र सरकारने जरी लॉकडाऊन, social distancing या प्रकारचे कायदे केले असले तरी भारतामध्ये मोठ्या प्रमाणात असणारी गरिबी, बेरोजगारी यामुळे हे कायदे लोकांवर लादणे कठीण होत चालले आहे. आता लॉकडाऊनच्या काळात रस्त्यावरून अर्धपोटी उपाशीपोटी कामगार, मजूर मोठ्या शहरांकडून हजारो किलोमीटरवर असलेल्या आपल्या मुळगावी जात आहेत. रस्त्यावरून पोलीस अडवतील म्हणून रेल्वे रुळावरून जात आहेत. गाड्यांखाली चिरडले जात आहेत. स्थानिक कंत्राटी मजूर, हातावर पोट असणारे स्वयंरोजगारी मजूर हे अशाच परिस्थितीत झोपडपट्टीत अर्धपोटीच राहत आहेत. तीच बाब शेतकऱ्यांची आहे. त्यांना त्यांच्या उत्पादनाचा खर्चदेखील मिळालेला नाही. त्यांच्यापुढे जगण्याचा, सुरक्षिततेचा व भाकरीचा खूप मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. रोग संक्रमणामुळे जेवढे मृत्यू होतील त्यापेक्षाही भूकबळी, हालअपेष्टा, असुरक्षितता आणि अपघात यामुळे भारतात जास्त मृत्यू होतील अशी भीती काही तज्ञांनी व्यक्त केली आहे. टाळेबंदीचा निर्णय जेव्हा सर्वोच्च पातळीवरून घेतला जातो, तेव्हा या अल्प उत्पन्न असणाऱ्या, घरापासून व अनेकदा कुटुंबीयापासून दूर राहावे लागणाऱ्या असुरक्षित घटकांचे काय करायचे? त्यांची व्यवस्था कशी करायची हे प्रश्न सत्ताधाऱ्यांच्या व प्रशासनाच्या लक्षात आले नसतील का? हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो.

**उपाययोजना**:

1) नागरिकांनी स्वतः स्वयंशिस्त पाळणे गरजेचे आहे. नागरिकांनी physical distancing चे नियम पाळावेत. जे पाळणार नाहीत त्यांना सरकारी यंत्रणेने बंधनकारक करावे. या नियमांचा भंग करणाऱ्यांना दंड करावा.

2) औषध व लसीचा शोध तसेच सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बळकट करीत कोरोनाच्या दुर्बल होत चाललेल्या विषाणूचे व्यवस्थापन करावे लागेल.

 Copyright ⓒ 2020 Authors

3) नागरिकांनी मास्कचा वापर करावा तसेच हात स्वच्छ धुण्यासाठी साबण अथवा सॅनिटायजरचा वापर केल्यास आपण या विषाणूच्या प्रसाराला प्रतिबंध करू शकतो.

4) घाबरून न जाता जिद्द, निर्धार आणि संयमाने प्रत्येक नागरिकाने कोविड-१९ विरुद्ध युद्ध जिंकण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करणे आवश्यक आहे.

5) आणखी लॉकडाऊन वाढवुन होणारे उत्पादनाचे, बेरोजगारीचे, दारिद्र्याचे हे नुकसान भरून काढता येणारे नाही. सरकारचे उत्पादन बंद झाले असतानाच सरकारचा अस्थापनावरील खर्च चालूच आहे. त्यासाठी अर्थव्यवस्था टप्प्याटप्प्याने प्रवाही करावी लागेल.

6) या महामारीविरोधात लढण्यासाठी केंद्र सरकारने भारताच्या एकूण जीडीपीच्या १०% म्हणजे वीस लाख कोटी एवढ्या आर्थिक मदतीची घोषणा केलेली आहे. या योजनेला त्यांनी **"आत्म निर्भर भारत"** असे नाव दिलेले आहे. ही आर्थिक मदत कारखान्यातील कामगार, शेतकरी आणि स्थलांतरित मजूर यांच्यासाठी असणार आहे.

7) "आहे तिथेच राहा, मूळ गावी जायची गरज नाही" अशी भूमिका घेतलेल्या केंद्र सरकारला अखेरीस राज्यांचे म्हणणे मान्य करावे लागले व स्थलांतरितांना आपल्या मूळ गावी पाठवणे हितावह ठरेल असा निर्णय सरकारने घेतला.

संदर्भ:

1) http/www.who.int.

2) http/www.wikipedia.org

3) http/www.unicef.org

4) http/m.youtube.com

5) http/www.india.gov.in

 Copyright ⓒ 2020 Authors